# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १३ वे, राजपत्र क्र. १४]   गुरुवार ते बुधवार, एप्रिल २-८, २०२६ : चैत्र १२-१८, शके १९४८ [पृष्ठे - १४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.


# भाग एक-छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| भाग एक-शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याच्याव्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | पृष्ठे ३९५ ते ३९७ |
| संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले. | ३९८ ते ४०६ |
| भाग एक-अ (भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत त्या व्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | पृष्ठे १४ ते १५ |


# शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**१**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून**
**नगर विकास विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ३१/१२/२०२५**

**आदेश**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६. :-**

**क्र. टिपीएस-३४२५/प्र.क्र.३८/२०२५/नवि-३० :-** ज्याअर्थी, कळंब शहराची सुधारीत विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-३४९९/१२९/सिआर-३१/९९/युडी-३०, दि. ०१/०४/२००० अन्वये मंजूर केली असून ती दि. १८/१०/२००० पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ. कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव येथील सर्व्हे नं. ९४ (अ) मधील क्षेत्र (यापुढे "उक्त आरक्षित जमीन" असे संबोधिले आहे.) 'आ.क्र.६३- खेळाचे मैदान' व 'आ.क्र.६४- प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान' आणि १२ मी. व १५ मी. विकास योजना रस्ता (यापुढे "उक्त आरक्षणे" असा उल्लेख केला आहे.) या प्रयोजनासाठी आरक्षित आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण कळंब नगरपरिषद, जि.धाराशिव आहे. (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असा उल्लेख केला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त आरक्षित जमीन, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीत संपादन केली नाही;

आणि ज्याअर्थी, सौ. लता किसन अडसुळ यांनी उक्त आरक्षणांखालील उक्त आरक्षित जमीनीपैकी मौ. कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव येथील सर्व्हे क्र. ९४ (अ) मधील उक्त आरक्षणांनी बाधित (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) त्यांच्या मालकीच्या क्षेत्राबाबत, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* नुसार नियोजन प्राधिकरण असलेल्या उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त आरक्षणांसंदर्भात उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* अन्वये दि.२१/०८/२०२० रोजी सूचना बजावली आहे. (यापुढे "उक्त सूचना" असा उल्लेख केलेला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६(४) सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केली नाही;

अनुसूची -१

(जमीनीचे वर्णन)

गावाचे नावः- मौजे कुंभारझरी ता. जाफ्राबाद जि. जालना

| अ.क्र. | भुमापन किंवा गट क्रमांक | मोजणी प्रमाणे क्षेत्र (हे.आर.मध्ये) |
|---|---|---|
| १ | ८२ | ०.३२ |
| २ | ८२ | ०.६१ |
| ३ | १०८ | ०.१५ |
| ४ | १७७ | ०.०५ |
| | एकुण | १.१३ |

अनुसूची -२

**प्रकल्पाचे नांव :** खडकपुर्णा प्रकल्प देऊळगाव राजा

प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रा करिता **मौजे कुंभारझरी** ता जाफ्राबाद जि. जालना येथील जमीन संपादना बाबत.

**प्रकल्पकार्याचे वर्णन :** खडकपुर्णा प्रकल्प देऊळगाव राजा **मौजे कुंभारझरी ता जाफ्राबाद जि. जालना** येथील जमीन बुडीत क्षेत्राकरिता संपादना बाबत.

**समाजास मिळणारा लाभ :** या प्रकल्पामुळे **मौजे कुंभारझरी ता जाफ्राबाद जि. जालना** येथील जमीन ओलीतीखाली येणार आहे. खडकपुर्णा प्रकल्पामुळे त्या लाभक्षेत्रातील जमीनीचे पाणीपातळी भरपूर प्रमाणत वाढ होणार आहे तसेच गावाच्या पिण्याचा पाण्याचा जनावराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या पाझर तलावाच्या कामामुळे रोजगारांची संधी मिळणार आहे. तसेच संपादना क्षेत्रालगतची जमीन ओलीत होणार असुन प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात लक्षणी वाढ होणार आहे व पर्यायाने खेड्यातील जीवनमानामध्ये सुधारणा होणार आहे.

अनुसूची -३

**बाधीत व्यक्तीचे विस्थापन कररण्यात भाग पाडणारी कारणे –** सदरचा प्रकल्प हा सिंचन क्षेत्रातील जमीन अधीकाधीक फायदेशीर उत्पन्न देणारी व लाभदायक व्हावी या साठी पाझर तलावाचे संपादन करण्यात आलेले आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम व सखोल शेतजमीनीवर असून त्यास शेतकऱ्यांनी संमती दिली आहे. यामध्ये कोणतेही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे अथवा कोणतीही व्यक्ती विस्थापीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

अनुसूची -४

**(सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश)**

लागु नाही

**टिपः-** उक्त जमिनीच्या नकाशाचे वर्णन **उपविभागीय अधिकारी भोकरदन जि. जालना** यांचे कार्यालयात निरीक्षणा करीता ठेवण्यात आला आहे.

ठिकाण :- भोकरदन

दिनांकः- ०१/०४/२०२६

**बी.सरवनन, भा.प्र.से.**
सहायक जिल्हाधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी भोकरदन.

---

१६

जिल्हाधिकारी नांदेड. यांजकडून

**अधिसूचना कलम १९**

दिनांक -०५/०२/२०२६

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३**

**क्रमांक २०२४/आरबी/डेस्क-३/भूसं/सिआर-८५**

**क्रमांक २०२४/उजिअ/लसिका/सिआर-१५.–** ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३० )(यात यापुढे ज्याचा निर्देश **उक्त अधिनियम** असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसुचना **पान क्र.२५४१-२५४२ वर दिनांक २०-२६ नोव्हेंबर २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे** आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूचि एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी **कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड** विभागाच्या खर्चाने करण्याची आवश्यकता आहे.

आणि ज्याअर्थी, नांदेड (जिल्हयाच्या) जिल्हाधिका-याने ,कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल,कोणताही असल्यास,विचारात घेतल्या नंतर,उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे या बाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणुन,उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये,उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असुन, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची एक

(संपादित करावयाच्या जमीनीचे वर्णन)

गावाचे नावः- गाडेगाव ता. जि.नांदेड

| अ.क्र. | भुमापन किंवा गट क्रमांक | संपादीत क्षेत्र (चौ.मी.मध्ये) |
|---|---|---|
| १ | १७८ | २२७ |
| २ | १७५ | १५९ |
| ३ | १८४ | १६० |
| ४ | १४४ | १४८ |
| ५ | २०९ | ३३४ |
| ६ | २०७ | १०६ |
| ७ | १३१ | २३४ |
| ८ | १३० | ७० |
| | एकुण | <u>१४३८</u> |

**अनुसूची दोन**

**(सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपा बाबत विवरण)**

**प्रकल्पाचे नांव :** भूसंपादन प्रस्ताव प्रमुख जिल्हा मार्ग ८३ कि.मी. ० ते ९३.७०० ब्राम्हणवाडा ,आमदुरा, माळकौठा या गावातील वळण रस्ता बांधकामासाठी मौ.गाडेगाव ता.जि.नांदेड

**प्रकल्पाचे नांव :** भूसंपादन प्रस्ताव प्रमुख जिल्हा मार्ग ८३ कि.मी. ० ते ९३.७०० ब्राम्हणवाडा ,आमदुरा, माळकौठा या गावातील वळण रस्ता बांधकामासाठी मौ.गाडेगाव ता.जि.नांदेड

**समाजाला होणारे लाभ :-** दळण वळण

**अनुसूची तीन**

**(पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन)**

गावाचे नाव - गाडेगाव ता. नांदेड जिल्हा नांदेड

लागु नाही

**अनुसूची चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

लागु नाही

**टिपः-**उक्त जमीनीच्या नकाशाचे निरीक्षण उपजिल्हाधिकारी भूसंपादन लघुसिंचन कामे नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड येथील कार्यालयात करता येईल.

दिनांकः- ५/०२/२०२६

ठिकाणः- नांदेड

**स्वा/-**

**(राहुल कर्डिले)**

जिल्हाधिकारी नांदेड.

---

**१७**

**उपजिल्हाधिकारी भूसंपादन लसिका, नांदेड यांजकडून**

**कलम ११ खालील अधिसुचना शुद्धीपत्रक**

**दिनांक २५.०३.२०२६**

**क्रमांक २०२१/उजिअ/लसिका/सिआर-२७** .— या कार्यालयाची भूमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ११ खालील अधिसुचना क्रमांक २०२१/उजिअ/लसिका/सिआर-२७ ही महाराश्ट्र शासन राजपत्रात दिनांक २३ ते २९ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध झाली आहे. त्यात खालील प्रमाणे दुरुस्ती वाचावी.

**अनुसूची**

**गावाचे नाव- वासरी ता. मुदखेड जि.नांदेड**

| | **करीता** | | **वाचावे** | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | ग.क्र. | संपादीत क्षेत्र हे.आर | गट क्र. | संपादीत क्षेत्र हे.आर |
| १ | ३६ | ०.०३ | ३६ | ०.१४ |
| २ | ४ | ०.०९ | ४ | ०.४६ |
| ३ | ३ | ०.२० | ३ | ०.३५ |
| ४ | २ | ०.०३ | २ | ०.१५ |
| ५ | १ | ०.०४ | १ | ०.१६ |
| ६ | ६ | ०.०४ | ६ | ०.१६ |
| ७ | ८ | ०.०२ | ८ | ०.०८ |
| ८ | ९ | ०.०२ | ९ | ०.०६ |
| ९ | ४२२ | ०.०८ | ४२२ | ०.४४ |
| १० | ४२० | ०.०९ | ४२० | ०.३८ |
| ११ | ४२९ | ०.०५ | ४२९ | ०.०३ |
| १२ | - | - | ४२९ | ०.०४ |
| १३ | - | - | ४२९ | ०.३० |
| १४ | - | - | ४२९ | ०.०१ |
| १५ | - | - | ४२९ | ०.०८ |
| १६ | ४१३ | ०.०५ | ४१३ | ०.०६ |
| **एकुण** | | **०.७४** | | **२.९०** |

**(प्रियांका पवार)**
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
लसिका, नांदेड

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.